**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 22/01/2020**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>जानेवारी महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 31 जानेवारी 2020 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1. प्रश्नोत्तरे.**

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**2.** घणसोली येथील पामबीच मार्गावर घणसोली ते ऐरोली खाडीवर ब्रीज बांधणे.

**3.** घरे व आस्थापनांमधुन उपयोगकर्ता शुल्क मालमत्ता करासोबत संकलन करणे.

**4.** महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- नमुंम-1219/प्र.क्र.64/ नवि-28, दिनांक 20 जानेवारी 2020 नुसार, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समितीचा नवीन 250 स्टेनलेस स्टीलचे बस निवारा थांबे बी.ओ.टी.(बांधा, वापरा, हस्तांतरीत करा) तत्वावर बांधणे व जाहिरातीचे हक्क देणेसंदर्भातील दिनांक 31/05/2019 रोजीचा ठराव क्र. 119, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम- 451(3) अन्वये अंतिमत: विखंडीत करणे.

**<u>ठरावाच्या सूचना</u> :-**

**5 व 6. श्री. राजेश शिवाजी शिंदे, यांजकडून:-**

**(5)** मा. मुख्यमंत्री श्री उध्दवजी ठाकरे साहेबांनी मुंबईतील 500 चौरस फुटापर्यतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याचे जाहीर केले होते. मुख्यमंत्री झाल्यानंतर मुंबई पालिकेने अशा घरांना मालमत्ता कर माफ करण्याची अंमलबजावणी सुरु केली. त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेने 500 चौरस फुटापर्यतच्या घरांना मालमत्ता धारकांचे कर माफ करणे. **(6)** मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेने ही एम.बी.बी.एस/ बी.ए.एम.एस. वैदयकिय महाविदयालय सुरु करावे. जेणेकरुन नवी मुंबईतील लोकांना चांगली वैदयकिय सेवा उपलब्ध होईल व नवी मुंबईतील विदयार्थ्यानाही वैदयकिय शैक्षणिक सुविधा सोईस्कर होईल.

**7. श्रीम. मंदाकिनी रमाकांत म्हात्रे, यांजकडून :-**

स्थायी समिती व महापालिका यांनी 1 फेब्रुवारी 2006 या दिवशी अधिनियम क्र.99 अंतर्गत सन 2006 - 2007 या वर्षासाठी मालमत्ता कराचे दर ठरविताना करपात्र मुल्यामध्ये एमआयडीसी ठाणे बेलापूर पट्ट्यामधील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी व कारखाने मालमत्ता 35 % व नोड व गावठाणे मधील मालमत्ताना निवासासाठी 50 % व अनिवासी मालमत्ता 40 % सुट देण्याचा ठराव करुन महापालिका आयुक्तांनी खात्याला तसे आदेश दिले. असे असताना हजारो मालमत्ता संगणक प्रणालीद्वारे त्या रिबेटपासुन वंचित ठेवण्यात आले आहेत. त्यांनी चेक लिस्ट सभागृहास सादर करावी व राहीलेल्या सर्व मालमत्ताधारकांना सर्व सुधारीत देयके देऊनच वसुली करावी. ज्यांनी जास्त रक्कमेचा भरणा केला आहे.त्या रक्कमेचा परतावा करावा.असे आयुक्तांना सभागृहाने ठरावाव्दारे आदेश दयावेत. कोणत्याही प्रकारे करदात्यावर अन्याय होणार नाही. याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी. खात्याकडे अशा प्रकारची किती निवेदने प्रलंबित आहेत. त्याचा आयुक्तांनी हिशेब द्यावा व चुक दुरुस्त करण्यात आली नाही अथवा दुरुस्त करता येत नसेल तर त्याचा खुलासा करावा. 2) लघुउदयोग संघटनेने उच्च न्यायालयामध्ये मालमत्ता कराविषयी अपिल दाखल केले आहे. (अपिल क्रं. कोर्ट नं. 4 Item नं. 36 पीटीशन 2552 to 2557 / 2017 WP Nos 8506 -2016, 8799- 2016, 8800-2016 etc.) Passed by the High Court Bombay यामध्ये अंतिम निकाल लागेपर्यत सर्वोच्च न्यायालयाने (Supreme Court )महापालिकेला आदेश दिले की जबरदस्तीने दंडात्मक वसुलीची कारवाई थकबाकी वसुलीसाठी करु नये. याचा अर्थ देयकाची रक्कम वसुल करावी. अशा आदेशाचे पालन करुन मालमत्ता धारकानी देयकाच्या रकमेचा भरणा केला असता. संगणकाव्दारे चुकीची प्रणाली कार्यरत असल्यामुळे व कर्मचाऱ्यांना प्रणालीव्दारे तशी देयकाच्या रक्कमेचीच वसुली करण्याची संगणकाला आज्ञा करण्याचे ज्ञान नसल्यामुळे बहूतांशी रक्कम दंडासाठी समायोचित झाली हे धोरण अन्यायकारक आहे. उदा.भुखंड D1 व D2 एम.आय.डी.सी. नेरुळ हया मालकाने करनिर्धारणासंबधी त्याला कळविल्यानंतर तात्काळ देयकाची वाट न पाहता 2 कोटी रुपयाचा भरणा केला.त्यापैकी 1 1/2 कोटी (दीड कोटी) रु.दंडासाठी समायोजित झाले. खरे म्हणजे याठिकाणी नियमाप्रमाणे देयकाच्या अभावी दंड देण्याचा नियमाव्दारे प्रश्नच उद्भवत नाही. महापौर साहेब नवी मुंबई महानगरपालिकेने तात्काळ संगणक प्रणाली सुधारणे व चुकीचा दंड लागु होत आहे.याला प्रशासनाने स्थगिती देऊन अशा प्रत्येक प्रकरणी मालमत्ताधारकाना उचित न्याय द्यावा. अधिनियमांच्या तरतुदी प्रशासनाने नीट समजुन घ्याव्यात व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आदेश प्रशासनास द्यावेत या प्रकरणी प्रशासनाने पुण खुलासा सदनास करावा. तसेच पुर्वलक्षी प्रभावाने नियमाविरुध्द मालमत्ता धारकंाच्या अनुमतीशिवाय कितीही वर्षे मागे जाऊन करनिर्धारणामध्ये वाढ करणे व दंडासहित मागणी करणे.प्रशासनातर्फे चालू आहे. याचे कर्मचारी वर्ग व अधिकारी असल्यामुळे मालमत्ताधारकांचा बळी जात आहे.म्हणून नियम क्रं.7 ते 20 व अधिनियम तरतुदी 128 ते 150 यांच्या तरतुदीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. असे आदेश मा.महापौरांनी आयुक्तांना देऊन सदनास अहवाल सादर करण्याचे आदेश दयावेत. यासंबंधी गोंधळाचे वातावरण पुर्ण संपुन मालमत्ताधारकांवर अन्याय होऊ नये. तसेच जी प्रकरणे अनुक्रमे सुनावणीसाठी, दुरुस्तीसाठी ,चुकीचा दंड लागू झाला आहे तो प्रणाली मध्ये दुरुस्त होऊन रद्द होण्यासाठी

| | |
|---|---|
| तशा प्रकारे करनिर्धारण पुस्तकांमध्ये सर्व दुरुस्त नोंदीची नोंद घेऊन तसे पुस्तक नियम 13 अंतर्गत सन 2020 - 2021 साठी 30 जानेवारीच्या आधी प्रसिध्द करुन प्राप्त तक्रारीचा निपटारा नियम 18 द्वारे करावा व करनिर्धारण पुस्तक पुढील देयके तयार करण्यासाठी प्रमाणित करावे असे आदेश सदनाने आयुक्तांना देऊन | त्याच्या कार्यवाहीचा अहवाल मागवावा. मी उपस्थित केलेल्या प्रकरणी दंडाच्या काही अटीवर जाहिर केलेल्या सार्वत्रिक माफीचा अशा प्रकरणामध्ये प्रश्नच उद्भवत नाही. कारण या प्रकरणी सर्व कालावधीसाठी सुधारित देयके वितरीत करणे आवश्यक आहे. |

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 22 जानेवारी 2020.**

<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

जा.क्र.नमुंमपा/मस/          /2020.
दिनांक   22/01/2020.

प्रति,
**मा. अतिरिक्त आयुक्त -1,**
नवी मुंबई महानगरपालिका.

महोदय,

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 31 जानेवारी 2020 रोजी भरणाऱ्या दुस-या मा. सर्वसाधारण सभेची नोटिस "दैनिक सकाळ", "दैनिक लोकमत" किंवा "दैनिक नवनगर" च्या दिनांक 10 जानेवारी 2020 रोजीच्या कोणत्याही एका अंकामध्ये जाहिरात स्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

**महापालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत : जनसंपर्क अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका.**